संत तुकारामांची शेतीविषयक सुभाषिते

प्रा. बापूराव सहदेव डोंगरे
संशोधक विद्यार्थी श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा
डॉ गजानन भाऊराव घोंगटे
मार्गदर्शक श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा

विषयप्रवेश
संत तुकारामांच्या अभंगवाणीतून अनेक सुभाषिते आज व्यवहारात उपयोगात वापरले जातात . त्यामुळे लोकांना व्यवहार ज्ञान मिळते . सोबतच जीवनाची, जगण्याची विविध रूपे त्यामधून दृष्टीस येतात . माणसाला शहाणे करतात. जीवन जगण्याची रीत शिकवितात . त्याचप्रमाणे काय करावे काय करू नये हा विचारसुद्धा ते सुचवतात. या शोधलेखामध्ये शेतीविषयक सुभाषिताचा अभ्यास करण्यात आला आहे .

प्रस्तावना

संत तुकारामांच्या अभंगवाणीतील शेतीविषयक सुभाषितामधून बी ,पेरणी,पाउस.इ बाबीविषयी सखोल विवेचन आले आहे..बी चांगले असले तरच त्यापासून चांगले पीक येऊ शकते .कुचर बियामुळे दुष्काळ पडत आहे. त्यापासून बचाव कसा करावा याविषयीचे सांगोपांग विवचन आले आहे.

शेतीविषयक सुभाषिते:

शेतीविषयक सुभाषितामध्ये तुकारामांनी की,बी, बियाची उगवणक्षमता , त्याचे अंकुरणे, खोल व ओल्या जमिनीत बी पडले तर चांगले पीक येतेए. इ.विषयीची माहिती दिली आहे . जमिनीची पत ,अंकुरातून जन्माला येणारी फळे, झाडे, इ. विषयीचे विवेचन केल आहे. कुणबी मढे झाकून पेरणी करतो. त्याला पेरणीचे महत्व कळते. तसेच पाण्याशिवाय पीकच नाही, ही वास्तविक भूमिका त्यांनी मांडली आहे. तुकाराम म्हणतात–

फळ देते चित्त बीजा ऐसे (७१) 1

मनामध्ये, चित्तामध्ये ज्या बीजाची रुजवणूक होते. ते फळ आपल्या कृतीतून होणाऱ्या कार्यावर अवलंबून असते. याच आशयाच्या दुसऱ्या सुभाषिनामध्ये ते म्हणतात–

बीजा ऐसे फळ दावी परिपाकी २४६

ज्याप्रमाणे बीज असते तसेच फळ आपल्याला मिळते ज्या बी पासून चांगले फळे तयार होतात. त्या बिया महत्वाच्या असतात . माणसाचेही तसेच आहे. चांगल्या विचाराची पेरणी केली तर चांगलीच फळे येतात . पाण्याला गोडी बियाण्याच्या चवीने निर्माण होते. तुकाराम म्हणतात–

बीज ज्यासी द्यावे ।
तुका म्हणे तैसे व्हावे ।। १८७८

पाणी ज्या बीजाला दिले जाते. त्याची गोडी त्या पाण्याला लागते. त्याप्रमाणे आपण वागावे हा विचार तुकाराम मांडतान. जसे बीज तसे फळ याविषयी ते म्हणतात–

फळ तेचि बीज बीज तेचि फळ । २०१७

जसे बीज तसे फळ आणि जसे फळ तेसे बीज यामधून ज्याप्रमाणे बीजाची रुजवणूक महत्वाची ,. त्याप्रमाणेच फळ तुम्हाला मिळते. बी' च्या पोटी स्वतःचे गुणधर्म असतात. त्याचेच फळ शेवटी आनंदाने चाखायला मिळते. चांगल्या कामाची महती येथे विशद केली आहे. ते म्हणतात–

तुका म्हणे बीज पोटी।
फळ तैसे चे सेवटी ।। २३३५

ज्या गुणाचे , दर्जाचे बीज असते. त्याच प्रकारचे फळ त्याला मिळते. बी चांगली असेल तर फळे चांगली आणि बी जर दर्जेदार नसेल तर फळ येत नाही. ते म्हणतात–

बिजाऐसी फळे / उत्तम का अमंगळे (१४६५)

बिजावर फळ अवलंबून असते. बीज चांगले असेल तरच उत्तम . त्याशिवाय उन्नती, प्रगती होणार नाही . तुकाराम म्हणतात –

बीज तेचि फळ येईल शेवटी। २०१०

कुठल्याही कार्याचा शेवट त्याने कोणत्या बिजाची पेरणी केली त्यावर त्याचा शेवट अवलंबून असतो. ते सुखाचे असेल तर सुख, दुःखाचे असेल तर दुःख मिळते. तुकाराम म्हणतात –

बीज ज्याचा सीण तेचि फळ ।। १५३८

बीज दुःखाचे असेल तर फळही दुःखाचे मिळते. तिथे आनंदाची शक्यता नाही. तुकाराम म्हणतात –

फळ बीजा ऐसे २१७५

जे बीज पेरावे त्याचीच फळे आपल्याला मिळतात. तुकाराम बीजाच्या शुद्धतेला , त्याच्या चांगुलपणाला, त्याच्या निवडीला महत्व देतात . आपण पेरतो त्याचेच फळ शेवटी आपल्याला मिळते. तुकाराम म्हणतात –

पेरिल्या बीजाचे। फळ घेई शेवटी ।। ३४६४

आपण पेरेललेल्या बीजाचेच फळ आपल्याला मिळते . त्याशिवाय या जगात कुठलाच परिणाम होत नाही. ज्या प्रकारचे अंकुर असतात, त्याप्रकारचे फळे जन्माला येतात . तुकाराम म्हणतात –

तुका म्हणे मोड दावी।
तैशी फळे आली व्हावी //२८२९

मोड आलेल्या अंकुरावरून फळाची गुणवत्ता ठरते. प्रत्येक गोष्ट संघर्ष करूनच मिळवावी लागते . तुकारामांना संघर्ष आयुष्यभर करावा लागला . याविषयी प्रा .ग.बा.सरदार म्हणतात –

"तुकारामांना आपल्या आयुष्यात पावलोपावली झगडा करावा लागल्यामुळे त्यांच्या साहित्यात शीतल , स्वप्नमयतेचा मागमूसही नाही." 2

हे मत येथे लागू होते .

ज्याप्रमाणे छोट्या बी ला संघर्ष करून त्याचे वृक्षात रुपांतर व्हायला कठिण परिश्रमातून जावे लागते . तसाच संघर्ष माणसाला करावा लागतो .चांगल्या फळाकरिता बीज चांगले असणे गरजेचे आहे. तुकाराम म्हणतात –

गोमट्या फळाची बीजाची फळे ही गोमटी (३४९५)

चांगल्या विचाराच्या माणसाची समाजात गरज असते. ती माणसे त्याच पर्कारची पिढी घडवतात. ज्याप्रमाणे एका बीजातून दुसरे बीज तयार होते.तशी वृत्ती या लोकांची असते . तुकाराम म्हणतात–

बीज वाढे बीजापोटी (५७८]

एका बीजातून दुसरी बी तयार होते. यामुळे निसर्ग समृद्ध हातो. समृद्धीची त्याला आवश्यकता असतो . मूलतः निसर्ग आपले काम करतच असतो. परंतु माणसे त्यामध्ये अडथळा निर्माण करतात. म्हणून माणसाला त्याच्या जतनाची आवश्यकता निर्माण होते. तुकाराम म्हणतात

एका बीजा केला नाश। मग भोगले कणीस ।। ७६७

एका बीजाला जमिनीत गाडून घ्यावे लागते. तेव्हा त्याचे कणीसात रूपांतर होऊन अनेक दाने आपल्याला मिळतात. माणसाच्या या जीवनसंघर्षाविषयी तुकारामांनी अनेक उदाहरण दिली आहेत. याविषयी डॉ .सदानंद मोरे म्हणतात –

"तुकोबा लोकांमध्ये राहिले व त्यांनी लोकांसाठीच आचरणाचा आदर्श दाखवून दिला ." 3

हे मत येथे लागू होते. चांगल्या विचाराचा आदर्श माणसांनी पेरावा हा विचार येथे व्यक्त होतो .

बीज पेरी सेती।
मग गाडेवरी वाहाती ।। २०८६

बीजाची पेरणी करतांना योग्य बिजांची निवड करावी लागते . योग्य बीजाच्या निवडीतून पेरणी योग्य वेळी केली, की गाडीभर धान्य आपल्याला मिळते.तुकाराम म्हणतात –

मढे झांकुनिया करिती पेरणी।
कुणबियाचे वाणी लवलाहे।/ (८२३)

पेरणी करताना त्याचा वेळ योग्य असणे गरजेचे आहे. कुणबी मढे झाकून पेरणी करतात . आपले काम करताना तो मृत्यूलाही ,मरणालाही,अंत्यविधीलाही बाजूला सारतात . ते पिकातील तनही वेळेवर बाजूला काढतात . तुकाराम म्हणतात –

निवडावे तन।
सेती करावे राखण ।। २१३७

पिकाला सर्वात मोठा अडथळा तनाचा असतो. तन आधीच योग्य वेळी काढावे लागते. शिवाय पिक जोमदारपणे येत नाही. सोबतच शेतीचे राखणही त्याच तन्मयतेने करावे लागते. जे बीज पेरले तेच उगवते. तुकाराम म्हणतात –

बीज पेरूनिया तो चि ध्यावे फळा।
डोरलीस केळ कैचे लागे ।। १०९४

आपल्या ज्या फळाची अपेक्षा आहे तेच फळ घ्यावे. कारल्याच्या वेलाला केळी कसे येणार ? हा मार्मिक प्रश्न तुकाराम मांडतात . शुद्ध बीज महत्वाचेच आहे जेथे बीज उगवण्याची क्षमता असते नेथेच बीज पेरावे. तुकारामांच्या या संवाद साधण्याच्या वृत्ती गो.नि. दांडेकर म्हणतात –

"–कधी प्रेमोद्गार त्यांच्या मुखवाटे फुटावेत ,कधी चिंतनमहिमा .कधी जनाविषयी करुणा .कधी आत्मस्थिती.असे एखाद्या संतात शिरल्यावर तेथ नाना वृक्षवल्लरीचे दर्शन घडावे तसे ."4

तुकारामाच्या व्यक्तिमत्वाचा हा आवाका दांडेकरांनी नेमकेपणाने मांडला आहे. कुठली बाब योग्य तऱ्हेने करावी ?केव्हा आणि कशी करावी ? बी पेरण्याचे उदाहरण देऊन ते म्हणतात –

उपतिष्ठे कारण। तेथे बीज पेरीजे ।। ३०५५

चांगली जागी शोधून बी पेरणे गरजेचे आहे. विनाकारण चुकीच्या जागी बी पेरून पेरून वाया घालवू नये.ओलं महत्वाची आह पूर्ण आहे, तुकाराम म्हणतात–

बीज न पेराव खडकी ओल नाही ज्याचे बुडखी / २२९०

खडकावर, जेथे ओल नाही तेथे बी पेरू नये. ते उगवणारच नाही. ते मरुण जाईल. त्यामुळे ओल असणारी जागी महत्वाची आहे. बीजरोपण कोठे करावे याविषयी तुकाराम म्हणतात–

खोली पडे ओली बीज /
तरीच हाता लागे निज ॥ ३१२५

खोलवर आणि जिथे ओल आहे तिथे बी पेरावे. तेव्हा कुठे आपल्या हाती संपूर्ण पीक येऊ शकते. बी वरवर पेरले तर ते श्रम वाया जाऊ शकतात. सोबतच बियाची उगवणक्षमता तपासणे अगत्याचे आहे. तुकाराम म्हणतात –

बीजा ऐसा द्यावा उदके अंकुर। २७२९

ज्याप्रमाणे बी असेल त्याचप्रमाणात पाणी द्यावे . नेहमी व जास्त पाणी देऊ नये. जास्त पाणी दिल्यानेसुद्धा बी जळून जाते. बीज अंकुरले पाहिजे. ओल नाही तेथे बी पेरणाऱ्याला तुकाराम मूर्ख समजतात .ते म्हणतात–

नाही तेथे ओल बीज वेची मुर्ख तो। २४७५

जिथे ओल नाही. पाणी येण्याची शक्यता नाही. अशा जमिनीन बी पेरणे मुर्खपणाचे लक्षण आहे. तिथे अपयश हमखास आहे येते . आपण ते टाळायला पाहिजे . पाण्याशिवाय शेती नाही. याविषयी तुकाराम म्हणतात –

तुका म्हणे जीवनेविण /
पीक नव्हे नव्हे जाणा। ७६५

सर्वांना जगण्यासाठी पाणी हवे असते. पाण्याशिवाय प्राणी, पशु, वनस्पती, वृक्ष, झाडे जगूच शकत नाहीत. तुकारामांच्या आत्मचिंतनाविषयी प्रा.वा. ल. कुलकर्णी म्हणतात –

१" त्यांचे जीवनचिंतन हे एका प्रगल्भ मनाने केलेले चिंतन आहे . "" 5 हे मत येथे लागू होते

शेतीसुध्दा पाण्याच्या आधाराने करावी लागते. पाऊस येण्यासाठी वृक्ष महत्वाचे आहेत . वृक्षाविषयी तुकाराम म्हणतात –

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे /
पक्षी ही सुस्वरे आळविती //२४८१

वृक्ष वल्ली आमचे सोयरे, सखे आहेत . निसर्गाविषयी आपण सर्वजन सामावलेले आहोत .शेतीसुद्धा या पर्यावरणाचा एक भाग आहे .

निष्कर्ष

१] संत तुकारामाच्या [पर्यावरण] शेतीविषयक सुभाषितामधून मानवी जीवनाचे विश्लेषण आले आहे.

२] संत तुकारामाच्या [पर्यावरण] शेतीविषयक सुभाषितामधून पेरणी करताना कुठल्या बाबीची काळजी घ्यावी याविषयी विवेचन आले आहे

3] संत तुकारामाच्या [पर्यावरण] शेतीविषयक सुभाषितामधून बियाच्या उगवण क्षमातेविषयीचे सारांश सांगतांना जीवनामध्ये कुठल्याही बाबीची रुजुवणूक कशी करावी याविषयीचे मत त्यांनीं मांडले आहे.

४] संत तुकारामाच्या [पर्यावरण] शेतीविषयक सुभाषितामधून वृक्ष व पाउस यांचे असणारे महत्व अधोरेखित केले आहे .

समारोप

संत तुकारामाच्या [पर्यावरण] शेतीविषयक सुभाषितामधून, बी, बियाची उगवणक्षमता ,बी कोठे पेरावे, कुचर बी कामाचे नाही. इ. माहिती सांगितली आहे. पेरणी करतांना कोणती काळजी घ्यावी हाही विचार त्यांनी मांडला आहे. शेती, बी, हे प्रतिकात्मकदृष्ट्या मानवी जीवनाचे आधार आहेत. जीवनामध्ये कुठल्याही कामाची सुरुवात, बीजोरोपण चांगल्याच पध्दतीने करायला पाहिजे. त्याशिवाय आपण यशस्वी होणार नाही. हा विचार तुकारामांनी मांडला आहे.

संदर्भग्रंथ

१] या लेखातील सर्व अभंग श्री तुकारामबुवाच्या अभंगाची गाथा, प्रकाशक ,सचिव ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ,मुंबई स्क्यनिंग करून पुनर्मुद्रण२०११ यामधून घेतले आहेत .

२]प्रा. गं.बा. सरदार ,संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई .द.आ. २०१९ पृ. क्र. १०८

3] डॉ सदानंद मोरे , तुकाराम दर्शन , प्रकाशक ,सकाळ पेपर्स प्रा.लि. पुणे ,पुनर्मुद्रण २०१५ जुलै पृ. क्र. १८८

४] गो .नि .दांडेकर ,तुका आकाशाएवढा ,मृण्मयी प्रकाशन ,पुणे पंचम आ . २०२४ पृ. क्र. १५३

५] वा. ल.कुलकर्णी ,मराठी कविता :जुनी आणि नवी ,पाप्युलर प्रकाशन , मुंबई १९९० पृ. क्र. ९०